Time : 2½ Hours

# HISTORY AND POLITICAL SCIENCE (M)

**(For Children With Special Needs)**

**Subject Code**

| S | 0 | 1 | 8 |
|---|---|---|---|

**Total No. of Questions : 5** **(Printed Pages : 8)** **Maximum Marks : 65**

***सूचना :*** (*i*) प्रत्येक प्रश्न नवीन पानावर लिहा.

(*ii*) प्रश्नांचा क्रमांक व उपक्रमांक स्पष्टपणे लिहा.

(*iii*) **सर्व** प्रश्न अनिवार्य आहेत.

(*iv*) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

1\. (अ) खालील प्रत्येक विधानासमोर तीन पर्याय (अ, ब, क) दिले आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडून त्याचे सुचकाक्षर विधानाच्या क्रमांकासमोर लिहा : 2

(1) अमेरिका खंडाचे नामकरण.......................यांच्या नावावरून करण्यात आले.

(अ) जॉन कॅबट

(ब) अमेरिगो व्हेस्पुसी

(क) ख्रिस्तोफर कोलंबस

(2) भौगोलिक उपक्रमात सर्वप्रथम पुढाकार ......................... ह्या देशाने घेतला.

(अ) इंग्लंड

(ब) स्पेन

(क) पोर्तुगाल

(3) दिशा-विषयक मार्गदर्शनासाठी दर्यावर्दी......................चा वापर करत.

(अ) होकायंत्र

(ब) वेधयंत्र

(क) नकाशे

(4) पृथ्वी गोल आहे हे सिद्ध......................यांनी केले.

(अ) बार्थोलोम्यू डायस

(ब) वास्को-द-गामा

(क) फर्डिनांड मॅगेलॉन

(ब) खालील प्रश्नांची प्रत्येकी **एका** वाक्यात उत्तरे लिहा : 5

(1) भौगोलिक शोध उपक्रमात पोर्तुगालची प्रमुख **तीन** उद्दिष्टे काय होती ?

---

(2) दक्षिण आफ्रिकेच्या टोकाशी असलेल्या भूशिराचे नामकरण काय करण्यात आले ?

---

(3) इंग्लंडमध्ये घडून आलेल्या आर्थिक विकासाचे वर्णन औद्योगिक क्रांती असे कोणी केले ?

---


(4) कापसाच्या बिया आपोआप अलग केल्या जाणाऱ्या यंत्राचे नाव लिहा.

---

(5) वसाहतीची पहिली परिषद कुठे घेण्यात अली ?

---

(क) खालील चित्राचे निरिक्षण करा व खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : 2



**(कापड गिरणीतले बाल कामगार)**

(1) कारखानदार बाल श्रमिकांना प्राधान्य का देत असे?

______________________________

(2) बाल श्रमिक दिवसातील किती तास कारखान्यात काम करत?

______________________________

(ड) खालील प्रश्नांची प्रत्येकी **दोन** वाक्यात उत्तरे लिहा : 6

(1) क्रांतीपूर्व काळात वाचन करणे फक्त श्रीमंत व उच्चभ्रू वर्गाचा विशेषाधिकार का होता?

______________________________

______________________________

(2) औद्योगिक क्रांतीमुळे 'आरामदेय जीवन' या संकल्पनेत बदल कसा झाला?

______________________________

______________________________

(3) जगाच्या इतिहासात अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध ही महत्वपूर्ण घटना का मानली जाते?

______________________________

______________________________

2. (अ) खालील 'अ' गटात काही व्यक्तींची नावे तर 'ब' गटात काही विधाने दिली आहेत. त्याच्या योग्य जोड्या जुळवून उत्तराचे सूचकाक्षर 'क' गटातील क्रमांकासमोर लिहा. 2

| **गट 'अ'** | **गट 'ब'** | **गट 'क'** |
|---|---|---|
| (1) मॉन्टेस्क्यू | (अ) अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार केला. | (1)........... |
| (2) थॉमस जेफर्सन | (ब) वसाहती सैन्याचा सरसेनापती | (2)........... |
| (3) जॉर्ज वॉशिंग्टन | (क) ईश्वरदत्त राजेशाही | (3)........... |
| (4) लुई सोळावा | (ड) सत्ताविभाजनाचा सिद्धांत मांडला. | (4)........... |
| | (ई) चर्चवर टिका केली | |

(ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 6

(1) सन् 1765 च्या 'स्टॅम्प एक्ट' या कायद्याची प्रमुख तरतुद कोणती होती ?

(2) फ्रांसमधील दहशतवादी राजवट केव्हा संपुष्टात आली ?

(3) पहिल्या इस्टेटमध्ये फ्रान्सच्या कोणत्या वर्गाचा समावेश होत असे ?

(4) चौथा फ्रेडरिक विल्यम यांच्या मृत्युनंतर प्रशियाचा राजा कोण बनला ?

(5) कोणते पुस्तक फ्रेंच क्रांतीकारकांचे प्रेरणास्रोत बनले ?

(6) फ्रेंच राजसभेचे प्रतिक कोणते ?

(क) खाली दिलेला परिच्छेद वाचा व त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : 3

"राष्ट्रासमोर असलेल्या महत्त्वाच्या समस्यांचे निराकरण संसदेतील भाषणे किंवा मतदानाद्वारे होत नाही तर रक्तपात व पोलादी सामर्थ्याद्वारे होते."

(1) वरील वाक्य कोणी म्हटले आहे ?

(2) वरील वाक्य कोणत्या संदर्भात म्हटले आहे ?

(3) जर्मनीच्या एकत्रीकरणास त्याने कोणास पाठिंबा दिला ?

(ड) खालील कोणत्याही **दोन** विधानाची प्रत्येकी **दोन** कारणे लिहा : 4

(1) गॅरिबाल्डींच्या लढाऊ संघटनेला 'रेड शर्ट' असे म्हटले जात असे.

___

___

(2) इटलीमध्ये 'कार्बोनरी' ही गुप्त संघटना स्थापन करण्यात आली.

___

___

(3) काव्हूर यांनी सार्डीनियात आर्थिक सुधारणा केल्या.

___

___

3. (अ) 'ब' रकान्यातील शब्दांचा संबंध 'अ' रकान्यातील शब्दांशी आहे. 'ड' रकान्यात 'क' रकान्यातील शब्दांशी तसाच संबधित शब्द क्रमांकासमोर लिहा. 2

| **क्र.** | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (1) | लोकमान्य टिळक | 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' | नेताजी सुभाषचंद्र बोस | ............ |
| (2) | बिपिनचंद्र पाल | न्यू इंडिया | अरविंद घोष | ............ |
| (3) | 19 डिसेंबर | गोवा मुक्तिदिन | 15 ऑगस्ट | ............ |
| (4) | 1954 चा सत्याग्रह | गोवा नेशनल कांग्रेस | 1955 चा सत्याग्रह | ............ |

(ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 4

(1) 'अभिनव भारत' ही क्रांतीकारी संघटना कोणी स्थापन केली ?

___

(2) गांधीजींनी आपल्या सहकाऱ्यांबरोबर साबरमती आश्रमापासून दांडीला का गेले ?

___

(3) पोर्तुगीज राजवटीतून गोवा मुक्त करण्यासाठी केलेल्या लष्करी कारवाईचे नाव लिहा.

---

(4) 'गोव्यातील स्वातंत्र्य लढ्याचा प्रवर्तक' असे कोणास म्हटले जाते ?

---

(क) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **दोन** वाक्यात लिहा : 4

(1) टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती साजरी करण्यास का सुरुवात केली.

---

---

(2) डॉ. सालाझार हा हुकुमशाह होता हे कोणत्या धोरणांवरून समजते ?

---

---

4. (अ) खालील 'अ' गटाचे 'ब' गटाशी योग्य जोड्या जुळवून उत्तराचे सूचकाक्षर 'क' गटात लिहा : 2

| **गट 'अ'** | **गट 'ब'** | **गट 'क'** |
|---|---|---|
| (1) राष्ट्रपती | (अ) सरकारचे प्रमुख | (1) ....... |
| (2) पंतप्रधान | (ब) लोकसभेचे व्यवस्थित संचालन करणे | (2) ....... |
| (3) उपराष्ट्रपती | (क) राष्ट्रप्रमुख | (3) ....... |
| (4) सभापती | (ड) राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष | (4) ........ |
| | (इ) राज्यमंत्री | |

(ब) खालील कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात उत्तरे लिहा : 2

(1) राष्ट्रपती राज्यसभेवर किती सदस्यांची नेमणूक करु शकतात ?

---

(2) लोकसभेच्या सदस्यत्वासाठी वयाची किती वर्षे पूर्ण झाली पाहिजे ?

---

(3) कायदेमंडळाचे प्राथमिक स्वरूपाचे काम कोणते ?

---

(क) खालील विधानाची प्रत्येकी **दोन** कारणे लिहा : 6

(1) राज्यसभा हे कायमस्वरूपी सभागृह आहे.

______________________________________________

______________________________________________

(2) राष्ट्रपतींना लष्करी अधिकार आहेत.

______________________________________________

______________________________________________

(3) सरकारमध्ये मंत्रीमंडळ समित्यांची योजना करण्यात आली आहे.

______________________________________________

______________________________________________

5. (अ) खालील प्रत्येक विधानासमोर तीन पर्याय (अ, ब, क) दिले आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडून त्यांचे सुचकाक्षर विधानाच्या क्रमांकासमोर लिहा : 2

(1) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नेमणूक..........................करतात.

(अ) राष्ट्रपती

(ब) पंतप्रधान

(क) उपराष्ट्रपती

(2) सर्वोच्च न्यायालयात मुख्य न्यायाधीश आणि.....................पेक्षा कमी न्यायाधीश असतात.

(अ) 20

(ब) 25

(क) 30

(3) राज्य मंत्रीमंडळाची नेमणूक.....................करतात.

(अ) पंतप्रधान

(ब) राज्यपाल

(क) राष्ट्रपती

(4) गोवा विधानसभेत.........................सदस्य आहेत.

(अ) 30

(ब) 35

(क) 40

(ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 5

(1) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाची कोणतीही **एक** पात्रता लिहा.

(2) राज्यपाल विधानसभेमध्ये अँग्लो इंडियन समाजातून किती सभासदांना नियुक्त करु शकतात ?

(3) गोवा विधानसभा संकुल कुठे आहे ?

(4) स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकांचे संचालन कोण करतात ?

(5) गोव्यात एकुण किती नगरपालिका आहेत ?

(क) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **दोन** वाक्यात लिहा : 6

(1) ग्राम पंचायतीची **दोन** प्रमुख कार्ये लिहा.

(2) राज्य विधानमंडळाचे **दोन** आर्थिक अधिकार लिहा.

(3) राज्यपालांचे **दोन** कार्यकारी अधिकार लिहा.

(ड) खालील कोणत्याही **एका** विधानाचे **दोन** कारणे लिहा : 2

(1) सर्वोच्च न्यायालयावर घटनेमधील तरतुदींचा नेमका अर्थ सांगण्याची जबाबदारी असते.

(2) सर्वोच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय आहे.